# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** श्री. गणेश उत्सव दरम्यान नागपूर शहरात मोठया प्रमाणात
**{घनकचरा व्यव. विभाग }** श्री. गणेश मुर्ती व इतर सणा निमित्त इतर अन्य मुर्तीची स्थापना करण्यात येते. सदर मुर्ती विशिष्ठ कालावधीनंतर विसर्जन करण्यात येते. सदर विसर्जनची व्यवस्था घनकचरा व्यवस्थापन विभागाचे क्षेत्रिय कार्यालयातर्फे करण्यात येत असुन या करीता कृत्रिम तलाव, FRP निर्माल्य कलश व HDPE पॉलिथिन चा पुरवठा क्षेत्रिय कार्यालयाची मागणी निहाय करण्यात येत असुन सदर साहित्याचा वेळोवेळी पुरवठा करण्याकरीता दोन वर्षाकरीता दरकरार करण्याकरीता ई-निविदा मागविण्यास्तव व यावर दोन वर्षात होणारा रु. ६४,५७,५४०/- खर्च पद क्र. A२४००१२२०३०१ मधुन भागविण्याचा प्रश्न विचारात घेण्याकरीता सादर.

**टिप** :- सविस्तर माहिती नस्ती मध्ये उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 181/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 24/07/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार श्री गणेश उत्सव दरम्यान नागपूर शहरात मोठया प्रमाणात श्री गणेश मुर्ती व इतर सणा निमित्त इतर अन्य मुर्तीची स्थापना करण्यात येते. सदर मुर्ती विशिष्ठ कालावधीनंतर विसर्जन करण्यात येते. सदर विसर्जनची व्यवस्था घनकचरा व्यवस्थापन विभागाचे क्षेत्रिय कार्यालयातर्फे करण्यात येत असुन या करीता कृत्रिम तलाव, FRP निर्माल्य कलश व HDPE पॉलिथिन चा पुरवठा क्षेत्रिय कार्यालयाची मागणी निहाय करण्यात येत असुन सदर साहित्याचा वेळोवेळी पुरवठा करण्याकरीता दोन वर्षाकरीता दरकरार करण्याकरीता ई-निविदा मागविण्यास्तव व यावर दोन वर्षात होणारा रु. ६४,५७,५४०/- खर्च पद क्र. A२४००१२२०३०१ मधुन भागविण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**